# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३
## सन २००७-२००८.

विषय क्रमांक- १ सोमवार दिनांक ७/१/२००८

ठराव क्रमांक - १ सोमवार दिनांक ७ /१/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/११/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा दि.२६/११/२००७ रोजी झालेल्या मा.स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे साठी मा.स्थायी समितीपुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :- मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे साठी सभे पुढे सादर केले आहे. त्या मध्ये काही दुरूस्त्या असल्यास त्या सुचवाव्यात .

मा.सभापती साहेब :- मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखवावे.

मा.श्री कोतकर भा.ए.:- मा.स्थायी समिती सदस्यांना सभे करीता देण्यांत येणारा भत्ता वाढवून जादा भत्ता देण्यांत येतो का ? तो द्यावा.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब - नियमानुसार देण्यांत येतो.

मा.श्री कोतकर भा.ए. - सभे करिता मा.सदस्य दूरवरून येतात त्यांना किलो मीटर प्रमाणे सभा भत्ता देण्यांत यावा.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :- मा.शासनाचे नियमानुसार सभा भत्ता देण्यांत येतो.

मा.श्री कोतकर भा.ए. :- मागील सभेचे इतिवृत्त वाचावे.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :-मागील सभेचे विषय व सभेने पारीत केलेले ठराव वाचून दाखवावे.त्या प्रमाणे मागील सभा दिनांक २६/११/२००७ रोजीचे विषय क्रमांक एक आणि ठराव वाचून दाखविला.

मा.श्री कोतकर भा.ए.:- जागा देणे बाबत काय निर्णय झाला काय घ्यावा? सर्वानी ठरवावे

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :- प्रोसिजर प्रमाणे इतिवृत्त कायम करणे साठी सभे पुढे सादर केले आहे? त्यात काही किरकोळ दुरूत्या असल्यास सुचवाव्यात.

मा.सभापती साहेब :- इतिवृत्तामधील पुढील विषय व ठराव वाचून दाखवावा. त्या प्रमाणे विषय क्रमांक दोन व ठराव वाचून दाखविला.

मा.श्री कोतकर भा.ए.- फक्त विषय वाचावेत.

त्या प्रमाणे पुढील विषय क्रमांक ३ ते ८ सभे मध्ये वाचून दाखविण्यांत आले.

मा.श्री कोतकर भा.ए.- विषय क्रमांक ८ मधील मंजूर केलेल्या जागांची यादी द्यावी.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागावर ७१ ठिकाणी जाहिरात फलक लावणे करिता जागा देणे बाबतचा प्रस्ताव होता.

मा.श्री.कोतकर भा.ए.:- कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सौ.दिघे वि.रा.:- मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- मागील सभा दिनांक २६/११/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त सर्वानुमते कायम करणेस मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा दिनांक २६/११/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक - मा.श्री.कोतकर भा.ए.

अनुमोदक - मा.सौ.दिघे वि.रा.

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक- २ सोमवार दिनांक ७/१/२००८

ठराव क्रमांक - २ सोमवार दिनांक ७ /१/२००८

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या केडगांव,नागापुर, बोल्हेगांव, फकिरवाडा, बुरूडगांव या ग्रामपंचायती मधील ३४१ कर्मचा-यांना मा.संचालक न.पा.प्रशासन संचालनालय यांचे आदेशानुसार दिनांक १/७/१९९९ ते दिनांक ३०/५/२००३ अखेर वेतन निश्चिती करून सेवाशर्ती लागू करणे (पेन्शन,इन्क्रीमेंट) फरक अदा करणे बाबत ऑफीस रिपोर्ट आदेशार्थ .

**प्रस्तावाचा मजकूर** - प्रस्तावना-विषय - हद्यवाढ झालेल्या पांच ग्रामपंचायती मधील कर्मचा-यांना पाचव्या वेतन आयोगा प्रमाणे वेतनश्रेणी व सेवाशर्ती लागू करणे बाबत.

हद्यवाढीत समाविष्ट झालेला केडगांव,नागापुर,बोल्हेगांव,बुरूडगांव,फकिरवाडा या पाच ग्रामपंचायती मधील ३४१ कर्मचा-यांना नगरपरिषद कर्मचा-याप्रमाणे वेतनश्रेणी व सेवाशर्ती लागू करणे बाबत मा.संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कडील क्र.नं.पस/ पदनि/ १०२०/ प्र.क्र.४२ / २००१/७ दिनांक १९/५/२००३ चा आदेश त्यावर दिनांक २२/५/०३ च्या सविस्तर रिपोर्टासह व तत्कालीन अध्यक्ष अहमदनगर न.प.यांचे निदेशासह सविस्तर रिपोर्ट मा.स्थायी समिती समोर आदेशार्थ .

येणे प्रमाणे कामगार विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभें मध्यें झालेली चर्चा .

मा.सभापती साहेब :- मा.उपायुक्त साहेबांनी सदर प्रकरणी माहिती द्यावी.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :- नगर पालिकेची हद्यवाढ झाली असतां या ग्रामपंचायती मधील ३४१ कर्मचारी न.पा.कडे वर्ग झाले. सदर कर्मचा-यांचे वेतन निश्चीती करून सेवाशर्ती लागु करणे बाबत प्रस्ताव न.पा. असतांना जनरल बोर्डाकडे सादर केला होता. मध्यंतरी न.पा. ची म.न.पा. झाली सन २००३ पासून सदर कर्मचा-यांना पाचव्या वेतन आयोगा प्रमाणे वेतन अदा करण्यांत येत आहे. सन १९९९ ते २००३ चे फरका विषयी मॅटर हायकोर्टात मध्ये प्रलंबीत असल्याने त्यावर काही बोलणे योग्य नाही असे मत आहे.

मा.श्री कोतकर भा.ए.:- सदर प्रकरणी मा.शासनाने मंजूरी दिलेली आहे. न.पा.चा कायदा व मनपाचे कायद्यात काय म्हटले आहे. याचा विचार व्हावा शासनाचे मंजुरी नुसार प्रस्तावास मंजूरी द्यावी. ३४१ कर्मचा-यांची फरक मिळण्याची इन्क्रीमेंट लागु करण्याची मागणी आहे. शासनाचे आदेश आहेत ते वाचुन दाखववे.

कामगार विभाग श्री. शित्रे :- मा.शासन आदेश क्रमांक नप्रस/ पदनि १०२०/प्रक.- ४२/२००१ /०७ दि. १९ मे २००३ चा शासन आदेश वाचून दाखवितो.उपरोक्त वाचा ४ - येथे नमूद केलेल्या शासन नगर विकास विभागाच्या दि.२९/६/१९९९ च्या अधिसुचने नुसार अहमदनगर नगरपरिषदच्या हद्यवाढ करण्यांस मान्यता दिलेली आहे. नगर परिषदेच्या हद्यवाढी मध्ये केडगांव, फकिरवाडा, ,नागापुर,बुरूडगांव, बोल्हेगांव या ग्रामपंचायतीचा समावेश करण्यांत आलेला आहे. उक्त ग्रामपंचायतीचे सर्व कर्मचारी व नोकर विनिर्दिष्ट दिनांकास व त्या दिनांकापासून विनिर्दिष्ट दिवसाच्या लगतपूर्वी त्यांना लागू असतील अशा अटी व शर्तीवर अहमदनगर नगरपरिषदेचे कर्मचारी नोकर असतील आणि उक्त परिषद किंवा अन्य कोणतेही सक्षम प्राधिकरण अशा शर्ती मध्ये यथोचित रित्या फेरफार करे पर्यत ते त्यांच शर्तीवर असतील परंतु विनिर्दिष्ट दिनांकाच्या लगतपूर्वी अशा कर्मचा-यांना व नोकरांना लागु असलेल्या सेवा शर्ती मध्ये राज्य शासनाची पूर्व मान्यता न घेता त्यांना अहितकारक होतील असे बदल करण्यांत येणार नाहीत.

मा.श्री कोतकर भा.ए.:- हा मुख्य मुद्या आहे. तो अधोरेखीत करा मा.शासनाने सेवाशर्ती लागु करणेस मंजूरी दिलेली आहे. त्या प्रमाणे मंजूरी द्यावी.

मा.श्री मैड स.ब.- नियमानुसार प्रमाणे कार्यवाही व्हावी.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :- तत्कालीन न.पा.ने कर्मचारी समाविष्ट करून घेतले. कर्मचारी फरकासाठी मे. कोर्टात गेले. औद्योगिक न्यायालया मध्ये प्रकरण प्रलंबीत आहे.

मा.श्री कोतकर भा.ए.:- सन २००३ मध्ये न.पा.चे अध्यक्षानी मंजूरी दिली न.पा.ची मनपा झाली तरीही निर्णय झला नाही पुढे चार वर्ष झाली तरी पण निर्णय नाही हा कर्मचा-यावर अन्याय आहे. राजकीय परिस्थीती मुळे मंजूरी झालेली नाही.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब - लागु करणेस हरकत नाही. परंतु प्रकरण में कोर्टात आहे. श्री ढाकणे यांनी माहिती द्यावी.

कामगार अधिकारी श्री ढाकणे आर.एम. :- औद्योगिक न्यायालयात अपिल प्रलंबीत आहे.

मा.श्री कोतकर भा.ए. :- न.पा. व म.न.पा.ने या कर्मचा-याचे मागणी प्रमाणे मंजूरी दिली नाही. म्हणूनच ते मे.कोर्टात गेलेले आहेत. मनपा झालेवर त्यांना मनपाच्या सेवाशर्ती लागु करणे बंधन कारक होते.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :- वाद मा.औद्योगिक न्यायालयात प्रलंबीत आहे. असे आमचे म्हणणे आहे. पूर्वीच जनरल बोर्डा मध्ये विषय मंजूर झाला असता तर सदर कारवाई पूर्वीच झाली असती त्यांचा मनाई हुकूमाचा अर्ज फेटाळयात आलेला आहे. प्रकरण औद्योगिक न्यायालयात प्रलंबीत असल्याने निर्णय घेवू शकत नाही.

मा.श्री कोतकर भा.ए.:- सन १९९९ ते सन २००३ साला पर्यत न.पा.ने या कर्मचा-या कडून त्यांचे पूर्वीचे पगारात काम करून घेतलेले आहे. मा.शासनाने मंजूरी दिलेली असून नियमानुसार त्यांना तेव्हा पासून वेतन निश्चीती करून सेवाशर्ती लागु करणे आवश्यक होते. या कर्मचा-यांची मागणी आपण मंजूर करत नाही तो पर्यत त्यांचे फरकाचा आर्थिक बोजा मनपावर वाढत जाईल. हा प्रस्ताव तेव्हाच मंजूर झालेला नाही. म्हणूनच कर्मचारी मे. कोर्टात गेलेले आहेत. त्यांच्या फरकाचा विषय बाजूला ठेवा त्यांचे इन्क्रीमेंट, पेन्शन फरकाचे काय? ते तरी मंजूर करावे.

मा.श्री तिवारी सु.र.:- ते केस विड्रॉल करतील का ?

मा.श्री कोतकर भा.ए.:- पांच कोटीचा फरक देण्यांस तयार असतील तर ते केस मागे घेतील.

मा.सभापती साहेब :- कोर्ट केस काढून घेतल्यास फरक देता येईल का ?

मुख्य लेखा अधिकारी श्री कर्डीले पी.बी. :- पदास मंजूरी असेल त्याप्रमाणे शासन निर्णया प्रमाणे देता येईल.इन्क्रीमेंट द्यायला हवे.

कामगार अधिकारी श्री ढाकणे आर.एम.:- मागील न.पा.चे अध्यक्षानी दिलेल्या निर्णया प्रमाणे जनरल बोर्डा मध्ये प्रस्ताव ठेवलेला होता. त्याना वेतन श्रेणी लागु केलेली आहे.

मुख्य लेखा अधिकारी श्री कर्डीले पी.बी.:- प्रोबेशनरी पिरीयडवर नेमणुक केल्यास त्या कालावधी नंतर कर्मचा-यांचे काम समाधानकारक असल्यास इन्क्रीमेंट देण्यांत येते. यांना दिलेले नाही त्यांचाही फरक द्यावा.

मा.श्री कोतकर भा.ए.:- मे.कोर्टातून केस विड्रॉल होईल.

मा.श्री मैड स.ब.:- मे.कोर्टात केस पेन्डींग असल्यास काय निर्णय घेणार नियमाप्रमाणे कारवाई करावी.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :- कोर्ट मॅटर असल्याने निर्णय सांगता येत नाही.

मा.सभापती साहेब :- कायदेशीर मत घेवून निर्णय घ्यावा.

मा.श्री कोतकर भा.ए.:- त्यांचे मत घ्यावे.

मा.श्री तिवारी सु.र.:- हे प्रकरण कोर्ट मॅटरचे आहे. लिगर रिटेनर यांनी सभेत हजर होणे आवश्यक होते. हा प्रस्ताव नगरपरिषदेचे वेळचा असून तो मनपा झाल्यावर नव्याने स्थायी समिती कडे यावयास हवा होता. हा विषय मा.औद्योगिक न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याने त्यावर चर्चा करू नये. मनपाचे आर्थिक हिताच्या विरूध्द निर्णय घेवू नये. त्यांचे सेवा शर्तीचे अभिलेख शासन दरबारी सादर करणेस सांगतिले होते. ते आढळत नाहीत. सदर विषय रद्द करावा. अन्यथा आमचा विरोध नोंदवावा मी मा.सभापती साहेबां कडेस आम्हा विरोधी पक्षांच्या सदस्यांचे वतीने पत्र देत आहे.त्याची नोंद घ्यावी.

मा.श्री शेख आ.शे.र.:- मनपाचे वकीलांना सभेत बोलवावे.

मा.सभापती साहेब :- लिगल रिटेनर यांना सभे मध्ये बोलवावे.

त्या प्रमाणे ॲड. सौ. स्वाती नगरकर हया सभे मध्ये हजर झाल्या.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :- हा विषय जुना पेंडीग असून न्याय प्रविष्ट आहे यावर आपले मत द्यावे. प्रस्तावाचा विषय वाचून दाखवावा.

त्या प्रमाणे विषय क्रमांक दोन वाचण्यांत आला.

ॲड.सौ.स्वाती नगरकर :- प्रकरण इंडस्ट्रियल कोर्टातील आहे हे काम ॲड श्री एस.के. पाटील पहातात. या प्रकरणांत मला मत देता येणार नाही या प्रकरणी तेच जास्त सांगू शकतील.

मा.श्री कोतकर भा.ए.:- कोर्ट केसचा निकाल लागेल तेव्हा फरकाचा विचार करावा इतर सवलती पेन्शन इन्क्रीमेंट देणेची कारवाई करावी. मा.उपायुक्त साहेब, मनपाचे लिगेल रिटेनर यांचे मत घेवून, त्यांचेशी चर्चा करून प्रस्ताव मंजूरीचा ठराव मा.सभापती साहेब यांनी करावा. तसे त्यांना अधिकार देण्यांत यावेत.

मा.श्री. शिंदे द.बा. :- मा.शासनाचे आदेशाप्रमाणे मंजूरी द्यावी.

मा.सभापती साहेब :- मा.शासनाचे आदेशान्वये दि.१/७/१९९९ पासून तत्कालीन नगर परिषदे कडेस वर्ग झालेल्या कर्मचा-यांना सन २००३ साला पासून पाचव्या वेतन आयोगा मधील सुरूवातीचे मूळ वेतन व त्यानुसार महागाई भत्ता दिला जातो. सदर कर्मचा-यांना तेव्हा पासुन त्यांचे वेतन निश्चीती करून फरक अदा केलेला नाही.त्या पैकी काही कर्मचा-यांनी मा.शासनाचे दिनांक १९/५/२००३ चे आदेशाची अंमल बजावणीसाठी मा.न्यायाल्यात विवाद उपस्थित केलेले आहेत पांचव्या वेतन आयोगाप्रमाणे फायदे देण्या विषयक आदेश तत्कालीन नगरपरिषदेवर व सध्याचे महानगपालिकेवर बंधन कारक असल्याने त्यांचे फरकाचे आर्थिक बोजा मध्ये वाढ होवू नये म्हणून सन १९९९ ते २००३ साला पर्यतचे अंदाजे रूपये पाच कोटीचे पगार फरकाचे मागणी संदर्भात मा.औद्योगिक न्यायालयाचे निर्णयास अधिन राहून संबधीत ३४१ कर्मचा-यांना त्यांचे सध्याचे वेतन श्रेणीत दिनांक १/६/२००३ पासून वेतन निश्चीती व वेतन वाढी विषयक फायदे (पेन्शन इन्क्रीमेंट इत्यादी ) देण्यांस बहुमताने मंजूरी देण्यांत येत आहे.

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या केडगांव,नागापुर, बोल्हेगांव, फकिरवाडा, बुरूडगांव या ग्रामपंचायती मधील ३४१ कर्मचा-यांना मा.संचालक न.पा.प्रशासन संचालनालय यांचे आदेशानुसार दिनांक १/७/१९९९ ते दिनांक ३०/५/२००३ अखेर वेतन निश्चिती करून सेवाशर्ती लागू करणे (पेन्शन,इन्क्रीमेंट) फरक अदा करणे बाबत ऑफीस रिपोर्ट आदेशार्थ .

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेध्ये समाविष्ट झालेल्या केडगांव ,नागापूर, बोल्हेगांव,फकिरवाडा, बुरूडगांव या ग्रामपंचायती मधील ३४१ कर्मचा-यांना मा.संचालक न.पा.प्रशासन संचालनालय यांचे आदेशानुसार दिनांक १/७/१९९९ ते दि.३०/५/२००३ अखेर पांचव्या वेतन आयोगा प्रमाणे वेतन निश्चीती करून फरक अदा करणे बाबतचे प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या साधक-बाधक चर्चे नुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

अहमदनगर शहराची हद्यवाढ होवून बारा गांवाचा समावेश अहमदनगर नगर परिषदेत झाला त्या मध्ये पांच ग्रामपंचायती मधील ३४१ कर्मचारी यांच्या सेवेवर अनुचित बदल न करतां ते नगर परिषदे मध्ये वर्ग झाले. शासनाचे दिनांक १९/५/२००३ चे आदेशान्वये दिनांक १/७/१९९९ पासून नगर परिषदे कडेस वर्ग झालेल्या कर्मचा-यांना पांचव्या वेतन आयोगा मधील सुरूवातीचे मूळ वेतन व त्यानुसार बदलता महागाई भत्ता दिला जातो. संबधीत कर्मचा-यांना अद्यापही दिनांक १/७/१९९९ पासून वेतन निश्चीती व फरक अदा केलेला नाही. त्या पैकी काही कर्मचा-यांनी महाराष्ट्र शासनाच्या आदेशाचे अंमल बजावणी साठीचे आवश्यक आदेशासाठी न्यायालयीन विवाद उपस्थित केलेले आहेत. संबंधीत ३४१ कर्मचा-यास पांचव्या वेतन आयोगाप्रमाणे फायदे देण्या विषयक आदेश तत्कालीन नगर परिषदेवर व सध्याचे महानगरपालिकेवर बंधनकारक असल्याने फरकाचे आर्थिक बोजा मध्ये वाढ होवू नये म्हणून सन १९९९ ते २००३ साला पर्यतचे अंदाजे रूपये पाच कोटीचे पगार फरकाचे मागणी संदर्भात मा.औद्योगिक न्यायालयाचे निर्णयास अधिन राहून संबधीत ३४१कर्मचा-यांना त्यांचे सध्याचे वेतन श्रेणीत दिनांक १/६/२००३पासुन वेतन निश्चीती व वेतनवाढी विषयक फायदे(पेन्शन इन्क्रीमेंट इत्यादी ) देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी

सदरचे ठराव मंजूरीस मा.स्थायी समीती सदस्य मा.श्रीमती बोरूडे इं.प.,मा.सौ मुदगल सु.द. मा सौ. शेंडगे रो.सं , मा.सौ.भागानगरे म.प्र., मा.सौ.गुरूड रा.र. , मा.श्री. तिवारी सु.र.यांचा विरोध.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री कोतकर भा.ए.

अनुमोदक :- मा.श्री शिंदे द.बा.

ठराव बहुमताने मंजूर .

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक - ३ सोमवार दिनांक ७ /१/२००८

ठराव क्रमांक - ३ सोमवार दिनांक ७ /१/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३९ चे तरतुदीनुसार श्रीमती अमिना बी शेख यांच्या मालकींच्या इमामवाडा, टिळक रोड येथील हजारी गादी कारखान्याचा परवाना रद्द करणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर -** प्रस्तावना-विषय - श्रीमती अमिना बी शेख यांच्या मालकीच्या इमामवाडा टिळक रोड येथील हजारी गादी कारखान्याचा परवाना रद्द करणे बाबत.

उपरोक्त विषयानुसार श्रीमती अमिना बी.शेख इस्माईल यांच्या मालकीच्या हजारी गादी कारखाना (कापूस पिंजाई) परवाना रद्द करणे बाबत सदर भागातील नागरिकांच्या वारंवार प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार, संबधित व्यवसाय धारक यांनी उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यानुसार म.न.पा.नगररचनाकार यांचे जा.क्र. १६२८ दि.२४/८/०७ ने ना -हरकत प्रमाण पत्र रद्द केले बाबत तसेच म.प्र.वि. मंडळ यांनी सदर व्यवसाय धारकांचे वस्तुस्थिती पाहुन समंती पत्र रद्द केले नुसार संपूर्ण प्रकरण प्रस्ताव सह म.न.पा. अधिनियम १९४९ चे कल ४३९ पॅरा ४ पॅरा ५ चे संक्रमन कालीन तरतुदीनुसार तत्कालीन नगरपरिषदेच्या ॲक्ट १९६५ मधील कलम २८१ (२) अ अन्वये परवाना घेवून नुतनीकरण न केले बाबत तसेच कलम २८० प्रमाणे उपविधीमधील कलम ८ प्रमाणे गादी कारखान्याचा परवाना रद्द करणे बाबत सदर प्रकरणा बाबत विधी सल्लागार यांचे मतानुसार व मा.आयुक्त साहेब यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा दिनांक ५/१२/२००७ रोजीचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेचे सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.सभापती साहेब - व्यवसाय बंद करणेचा प्रस्ताव आहे. संबधीतांना यांची नोटीस दिली आहे का?

उपआरोग्याधिकारी डॉ.श्री पैठणकर एन.एस- नोटीस दिलेली आहे. नागरिकांचे तक्रारी नुसार कारवाई केलेली आहे.

मा.श्री शेखआरिफ शे.र.:- त्यांनी एन ओ सी घेतली होती ना ? त्याभागामध्ये किती सॉमिल्स चालु आहेत त्यांच्या भुश्श्यांचे प्रदूषण होत नाही का?

उपआरोग्याधिकारी डॉ.श्री पैठणकर एन.एस :- त्यांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे एन.ओ.सी. नुसार नगररचनाकार विभागाने एन ओ सी दिलेली होती त्या एन.ओ.सी. नुसार तेव्हा सदरचे व्यवसायास लायसन्स दिले होते. नागरिकांचे तक्रारी नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी एन.ओ.सी.रद्द केलेले आहे.व्यवसाय परवाना रद्द करणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री शेख आरिफ शे.र.- पिंजार गल्ली मध्ये भर वस्तीत किती गादी कारखाने आहेत.

मा.श्री शिंदे द.बा.- जागा मालकाशी वाद असेल पिंजार गल्लीतल्या व्यवसायाच्या तक्रारी येत नाहीत येथे येत असतील.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने एन.ओ.सी. रद्द केलेली आहे. ते एन.ओ.सी देत नाहीत नागरिकांच्या तक्रारी आहेत. त्यानुसार व्यवसाय परवाना रद्द करणेचा प्रस्ताव सभेपुढे सादर केलेलाआहे.

मा.श्री शेख आरिफ शे.र.:- प्रस्ताव पुढील सभे मध्ये निर्णया साठी घेण्यांत यावा.

मा.सौ. दिघे वि.रा. - पिंजार गल्ली मध्ये किती गादी कारखाने आहेत.त्याचे प्रदूषण होत नाही का? हा प्रस्ताव पुढील सभे मध्ये निर्णयासाठी घेण्यांत यावा.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते सदरचा प्रस्ताव पुढील सभे मध्ये निर्णयासाठी घेण्यांत यावा.

**ठराव** - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३९ चे तरतुदी नुसार श्रीमती अमिनी बी शेख यांच्या मालकीच्या इमामवाडा टिळक रोड येथील हजारी गादी कारखान्याचा परवाना रद्द करणे बाबत प्रशासनाने सादर केलेला प्रस्ताव पुढील सभे मध्ये निर्णया साठी घेण्यांत यावा.

सुचक - मा.सौ.दिघे वि.रा.

अनुमोदक - मा.श्री शेख आरिफ शे.र.

ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३**

सन २००७-२००८.

विषय क्रमांक-४ सोमवार दिनांक ७/१/२००८

ठराव क्रमांक -४ सोमवार दिनांक ७/१/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे बुरूडगांव स.नं.३४ पै.जागेवरील कचरा डेपो भोवती १२ व्या वित्त आयोगा अंतर्गत कंपाउन्ड वॉल बांधणेचे कामास व एस्टिमेट रूपये २७,३०,७६५/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** - विषय - १२ वा केंद्रीय वित्त आयोगा अंतर्गत बुरूडगांव स.न. ३४ पैकी महानगरपालिकेच्या कचरा डेपोच्या जागेभोवती कंम्पौंन्ड वॉल बांधणे

सविनय सादर,

बुरूडगांव स.नं. ३४ पैकी या जागेवर अहमदनगर महानगरपालिकेचे कचरा डेपो आहे. सदर ठिकाणी सद्यस्थितीत बायो मेडिकल वेस्ट प्लॅन्ट कार्यरत असून कच-या पासून खत निर्मिती बाबतचा प्रकल्प महानगरपालिकेस उभारावयाचा आहे.

सद्यस्थितीत सदरच्या वीस एकर जागेभोवती कंम्पौन्डची व्यवस्था नसल्यामुळे व वा-यामुळे कचरा डेपो मधील कचरा उडून इतर शेजारी असलेल्या शेतजमिनी मध्ये जावून पडतो. व त्यामुळे शेतक-यांना त्याचा त्रास होतो. डेपो शेजारील शेतक-यांनी मा.आयुक्त यांची भेट घेवून कचरा डेपो भोवती कंम्पौन्ड बांधण्या करिता विनंती केली जेणे करून डेपो मधील वा-यामुळे उडणारा कचरा शेजारील शेतजमिनीत जाणार नाही. व त्यांचे पिकांचे नुकसान होणार नाही.

अहमदनगर महानगरपालिकेचे सदर ठिकाणी कच-या पासून गांडूळखंत निर्मितीचे प्रयोजन असल्यामुळे त्या करिता संरक्षण भिंत बांधणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत कंम्पौन्ड वॉल नसल्यामुळे सदर ठिकाणी मोकाट जनावरांचा मोठया प्रमाणात वापर असल्यामुळे तेथील कर्मचा-यांना त्याचा त्रास होतो. त्यानुसार सदर ठिकाणी समक्ष पहाणी करून कंम्पौंन्ड वॉल बांधणे बाबतचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून अंदाजपत्रकीय रककम रू. २७,३०,७६५/- इतकी आहे. तरी सदरच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळणेस रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा दिनांक १/१२/२००७ रोजीचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेचे सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा

मा.श्री तिवारी सु.र.- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ.पवार सं.बा.- मंजूर करावा.

मा.सौ.खरपुडे ज.सु.- प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा.

मा.सभापती साहेब - सर्वानुमते ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत यावा.

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिकेचे बुरूडगांव सर्व्हे नं.३४ पैकी जागेवरील कचरा डेपो भोवती १२ व्या वित्त आयोगा अंतर्गत कंपाउन्ड वॉल बांधणेचे कामास व एस्टिमेट रूपये २७,३०,७६५/- (रूपये सत्तावीस लाख तीस हजार सातशे पासष्ठ फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी

सुचक - मा.सौ.पवार सं.बा.

अनुमोदक -मा.सौ.खरपुडे ज.सु.

ठराव सर्वानुमते मंजूर .

सही/-

सभापती,

स्थायी समिती,

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-५ सोमवार दिनांक ७/१/२००८

ठराव क्रमांक -५ सोमवार दिनांक ७/१/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पिंपळगांव माळवी येथील तलावाचे बुडीत क्षेत्रात डोंगरगण ग्रामपंचायत ता.नगर येथील प्रस्तावीत पाणी पुरवठा योजनेच्या उदभव विहीरीचे खोदाईस परवानगी देणे बाबत ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकूर** - विषय - डोंगरगण ता.नगर येथील प्रस्तावीत नळ पाणी पुरवठा योजनेकरिता उद्‌भव विहीर घेणेस मा. स्थायी समितीची मंजूरी मिळणे बाबत.

मा.सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर कि ,सरपंच ग्रामपंचायत डोंगरगण यांचे दि. १८/९/०७ रोजीचे अर्ज व १५/८/०७ रोजीचे ठराव क्र.५ नुसार शहर पाणी पुरवठा विभागाकडून १/११/०७ रोजी प्रस्ताव ठेवला असता मा.अंतर्गत लेखा परिक्षक मुख्यलेखा अधिकारी तसेच नगर रचना विभागाने मु.प्रा.महानगरपालिका १९४९ चे कलम नं. ७९ अन्वये विहिर खननेच्या जागेचे भाडे वसूल करणे कामी वार्षिक भाडे रू.४०००/- प्रति वर्ष याप्रमाणे तसेच सदर विहीरीचे पाणी अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ मधील नगरपालिकेच्या मालमत्तेच्या विनीयोग कलम ७९ (ब) अन्वये सदर जागेवरील महानगरपालिकेचा मालकी हक्क अबादित ठेवून मीटरद्वारे पाटबंधारे विभागकडील शासनाच्या दराप्रमाणे पुरविणे कामी मंजूरी मिळणेस्तव व भविष्यात महानगरपालिकेस पाण्याची गरज भासल्यास अगर इतर कारणास्तव तलावाच्या क्षेत्राचा वापर करावयाचा झाल्यास परवानगी महानगरपालिका एक तर्फे रद्द करेल अशा प्रकारची मंजूरी देणेस्तव मा.आयुक्त साहेब यांचे दि.७/१२/०७ चे मंजूरी अन्वये मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणेस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.सभापती साहेब - डोंगरगण ग्रामपंचायतीचे पाणी पुरवठा योजनेचे विहिर खोदाईस परवानगी देणे विषयी प्रस्ताव मंजूरी साठी आहे.

मा.श्री.शिंदे द.बा.- प्रस्ताव मंजूर करावा.

मा.सौ.खरपुडे ज.सु.- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत यावा.

मा.सभापती साहेब - ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिकेचे पिंपळगांव माळवी येथील तलावाच्या बुडीत क्षेत्रात डोंगरगण ग्रामपंचायत तालुका नगर येथील प्रस्तावीत नळ पाणी पुरवठा योजनेच्या उद्‌भव विहीरीचे खोदाईस परवानगी देणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर नियमानुसार पुढील कार्यवाही करावी

सुचक - मा.श्री.शिंदे द.बा.

अनुमोदक - मा.सौ.खरपुडे ज.सु.

ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-६ सोमवार दिनांक ७/१/२००८

ठराव क्रमांक -६ सोमवार दिनांक ७/१/२००८

**प्रस्तावाचा विषय -** अहमदनगर महनगरपालिके मार्फत महापौर चषका अंतर्गत " नगर - रांजणगांव - नगर " अशी राष्ट्रीय स्तरावरील सायकल स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणारे अदांजे रक्कम रूपये २,७०,०००/- चे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकूर -** विषय - राष्ट्रीय पातळीवरील नगर-राजणगांव - नगर सायकल स्पर्धेच्या रक्कम रू.२,७०,०००/- चे खर्चास मा.स्थायी समितीमध्ये मान्यता मिळणे बाबत.

अहमदनगर महानगरपालिके मार्फत्त राष्ट्रीय पातळीवर नगर- राजणगांव - नगर सायकल स्पर्धेचे आयोजन करावयाचे आहे. स्पर्धे करिता अंदाजे खर्च रक्कम रूपये २,७०,०००/- चे ऑफिस रिपोर्टवर मा.महापौर साहेब व मा.आयुक्त साहेब यांचे चर्चे नुसार मा.आयुक्त साहेब यांनी सायकल स्पर्धेच्या खर्चाच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीमध्ये मान्यता घेण्यांत यावी असे सुचित केलेले असल्यामुळे मा.स्थायी समिती पुढे मान्यतेस्तव सादर.

येणे प्रमाणे सहाय्यक आयुक्त यांचा दिनांक १०/१२/२००७ रोजीचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.सभापती साहेब - आपले महानगरपालिके मार्फत सायकल स्पर्धा भरविणेस व खर्चास मंजूरी देणेचा प्रस्ताव आहे.

मा.श्री शिंदे द.बा.- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री शेख आरिफ शे. र.- विषय मंजूर करावा

मा.सभापती साहेब - सर्वानुमते ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिक मार्फत महापौर चषका अंतर्गत "नगर-रांजणगांव - नगर अशी राष्ट्रीय स्तरावरील सायकल स्पर्धा आयोजीत करण्यांस व त्या कामी येणारे अंदाजे रक्कम रूपये २,७०,०००/- (रूपये दोन लाख सत्तर हजार फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी

सुचक - मा.श्री शिंदे द.बा

अनुमोदक -मा.श्री शेख आरिफ शे. र

ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-७ सोमवार दिनांक ७/१/२००८

ठराव क्रमांक -७ सोमवार दिनांक ७/१/२००८

**प्रस्तावाचा विषय -** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ११ मधील सावेडी गांवठाण अंतर्गत रस्ते सिमेंट कॉक्रीट करणेचे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजना या लेखा शिर्षका अंतर्गतचे निधीतून करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकूर** - प्रस्तावना ,

विषय - प्र.क.११ मधील सावेडी गावठाण अंतर्गत रस्ते सिमेंट कॉक्रीट करणे बाबत.

सविनय सादर,

उपरोक्त विषयानुसार खालील प्रमाणे अहवाल देण्यांत येतो कि, प्र.क.११ मधील सावेडी गावठाण अंतर्गत रस्ते सिमेंट कॉक्रीट करणे हे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजना या लेखा शिर्षकातून प्रस्तावीत केलेले आहे. त्यानुसार मुख्य लेखा अधिकारी यांनी खालील मुद्दे मांडलेले आहेत.

१. महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,आरोग्य विभाग परिपत्रक दि.३ जुलै १९८२ मधील तरतुदी पाहता समाजातील दुर्बल घटक, अनुसुचित जाती,अनुसुचीत जमाती,विमुक्त जाती व भटक्या जमाती यांचे कल्याणकारी योजने साठी महसुली उत्पन्नातून बांधील खर्च जाता ५% निधी राखुन ठेवावा असे निर्देश आहेत.
२. सदर ५% निधीतून कोणत्या बाबींवर खर्च करावा अशा बाबींचा उल्लेखही सदर परिपत्रकात आहे. त्यानुसार सदरचे रस्त्याचे काम करता येईल.
३. अंदाजपत्रकात १.०० कोटी मागासर्वीय कल्याणकारी योजनांसाठी व रू.५०.०० लाख मागासवर्गीय योजनेतून सिध्दार्थ नगर येथे पाण्याची टाकी बांधणे अशी १.५० कोटीची तरतूद आहे. त्यातून उपरोक्त काम करता येईल मान्यतेस्तव सविनय सादर तसेच मा.आयुक्त साहेब यांनी सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणे बाबत सुचित केलेले आहेत.

यास्तव अहवाल अवलोकनार्थ तसेच विषय मंजूरीसाठी मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा दिनांक १/१२/२००७ रोजीचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.श्री तिवारी सु.र.- सदर प्रस्तावाचे मंजूरीस हरकत नाही म.न.पाचे फंडामधील ५% निधी मधून हा प्रस्ताव मंजूर करतायेईल का ?

मा.सभापती साहेब - दुस-या भागात अशी कामे घेता येतात का?

कार्यकारी अभिंयता श्री मगर एन.बी. - होय ५% राखीव निधी मधून आर्थिक दृष्टया मागासवर्गीय भागातही अशी कामे घेता येतील.सावेडीत अशी लोकसंख्या जास्त आहे.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब - वॉर्डा मध्ये ५०% मागासवर्गीय लोकसंख्या पाहीजे. ५% राखीव निधी मागासवर्गीयाचे राखीव भागात खर्च करतात.

मा.श्री तिवारी सु.र. - ७० ते ८०% मागासवर्गीय लोकसंख्या असूनही कामे झालेली नाहीत.
मुख्यलेखाधिकारी श्री कर्डीले पी.बी.- आर्थिक दृष्टया मागासवर्गीयाचे भागात ही अशी कामे घेता येतात असे मुख्य अभियंता यांनी मत दिलेले आहे.
मा.श्री तिवारी सु.र.- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.
मा.सौ. दिघे वि.र- मंजूर करण्यांत यावा.
मा.सौ.खरपुडे ज.सु.- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत यावा.
मा.सभापती साहेब - ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग कमांक ११ मधील सावेडी गावठाण अंतर्गत रस्ते सिमेंट कॉक्रीट करणेचे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजना या लेखा शिर्षका अंतर्गतचे निधीतून करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर .

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.
सुचक - मा.सौ.दिघे वि.रा.
अनुमोदक - मा.सौ.खरपुडे ज.सु

ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-८ सोमवार दिनांक ७/१/२००८

ठराव क्रमांक -८ सोमवार दिनांक ७/१/२००८

**प्रस्तावाचा विषय** - एकात्मीक शहर विकास योजना अंतर्गत नगररचना योजना क्र.४ अं.भू.क्र.२६२ मिस्कीन मळा सावेडी येथे बगीचा विकसीत करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचे अंतिम मंजूरीचे निर्णया बाबत कार्यालयीन प्रस्ताव फेर विचारार्थ .

**प्रस्तावाचा मजकूर** - मा.सादर, विषय - एकात्मिक शहर विकास योजना अंतर्गत नगररचना योजना क्र.४ अं.भू.क्र. २६२ मिस्कीन मळा सावेडी येथे बगीचा विकसीत करणे बाबत.

उपरोक्त विषयाबाबत दि.२२/६/२००७ रोजी निविदा प्रसिध्द होवून दि. २०/७/२००७ रोजी उघडण्यांत आल्या. दिनांक २१/८/२००७ रोजी छाननी समिती समोर छाननी होवून सर्वात कमी दर असणारे ठेकेदार श्री.ए.सी.शेख यांनी त्यांचादेकार २९ % वरून २३.५% इतका कमी केला. तद्नंतर प्रस्तावाप्रमाणे निविदा स्विकृती शिफारस दि.३/९/२००७ रोजी मा. स्थायी समिती कडे केली.

दि. १९/९/२००७ च्या स्थायी समिती बैठकीत फेर निविदा काढण्याचा ठराव संमत आहे. तद्नंतर दि.४/१०/२००७ रोजीच्या स्थायी समिती बैठकीत ठराव क्र.१ अन्वये निविदा मंजूरी बाबत निर्देशीत केले होते. त्यानुसार ठरावाच्या अनुषंगाने या प्रकरणी कायदेशीर मत घेणे बाबत श्री एस.के.पाटील लिगल रिटेनर यांना कायदेशीर लेखी मत मागविणेसाठी जा.क्र.१५११ दि.२९/१०/२००७ रोजीच्या पत्रानुसार कळविले होते. परंतु त्यांचे कडून दि.३/१२/२००७ रोजी कायदेशीर मत प्राप्त झालेले आहे. त्यानुसार सदरची निविदा मंजूरीचा अधिकार हा स्थायी समितीचा आहे. असे त्यांनी लेखी कळविले.मा.आयुक्त यांचेकडे सदरचा प्रस्ताव सदर केला असता प्रस्तावीत प्रकरणी अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार स्थायी समितीला असल्याने फेर विचारार्थ / निर्णयासाठी मा.स्थायी समितीकडे सादर करण्यास मान्यता दिलेला आहे.

तरी अंतिम मान्यतेसाठी प्रस्ताव स्थायी समितीकडे व पुढील निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा दिनांक २०/१२/२००७ रोजीचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.श्री तिवारी सु.र. - प्रस्तावावर मागील सभे मध्ये बरीच चर्चा झालेली आहे. प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करावा.

मा.श्री शेख आरिफ शे.र.- आलेले कमीचे दर मंजूर करावे.

मा.सौ. दिघे वि.रा.- कमीचे दर मंजूर करावे.

मा.सभापती साहेब - प्रस्तावा नुसार आलेले कमीचे दरास मंजूरी देण्यांत यावी नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

**ठराव** - एकात्मीक शहर विकास योजने अंतर्गत नगररचना योजना क्रमांक ४ अंतिम भूखंड क्रमांक २६२ मिस्कीन मळा येथे बगीचा विकसीत करणे कामी मागविण्यांत आलेल्या स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक श्री ए.सी.शेख यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.५% (तेवीस पूर्णांक पाच दशांश टक्के ) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी
सुचक - मा.श्री शेख आरिफ शे.र.

अनुमोदक -मा.सौ. दिघे वि.रा.
ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३
सन २००७-२००८.

विषय क्रमांक-९ सोमवार दिनांक ७/१/२००८

ठराव क्रमांक -९ सोमवार दिनांक ७/१/२००८

**प्रस्तावाचा विषय -** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १२ मधील वैदुवाडी कमलकुंज घर ते रेणुका स्टील दराम्यान ३०० एम.एम. व्यासाची गटर करणेचे एस्टीमेट रूपये ३,१०,८४३/- चे खर्चाचे काम सन २००७-२००८ मधील मागासवर्गीय कल्याणकारी योजने मधून करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकूर -** प्रस्तावना - विषय - निविदा मंजूरी बाबत.

कामाचे नांव - प्र.क्र. १२ मध्ये वैदुवाडी कमलकुंज घर ते रेणुका स्टील दरम्यान ३०० एम.एम. व्यासाची गटर करणे.

महोदय,

उपरोक्त विषयी खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यांत येत आहे.

प्र.क्र.१२ मधील नगरसेविका सौ. राधा रमेश गुरूड यांनी प्र.क्र.१२ मध्ये वैदुवाडी कमलकुंज घर ते रेणुका स्टील दरम्यान ३०० एम.एम व्यासाची गटर करणे या विषयाचे काम करणे बाबत दि.२५/५/०७ रोजी यादी देवून सुचविले असता त्यानुसार सदर भागात संबधीत शाखा अभियंता यांनी पाहणी केली असता वरील विषयाचे काम करणे आवश्यक असल्याने त्यानुसार मोजमापे घेवून अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.३,१०,८४३/- इतकी आहे. तरी सदरचे काम सन २००७-२००८ मधील मागसवर्गीय कल्याणकारी योजना निधी मधून करणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा.नगररचनाकार यांचा दि.२४/९/०७ अन्वये अभिप्राय मागितला असता त्यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र .टी.पी. २५९३ दि.२६/१०/०७ अन्वये उपरोक्त काम करणे बाबत हरकत नसल्याचे कळविले आहे.

मा.आयुक्त यांनी दि.१५/१२/०७ रोजी विषयांकित प्रस्ताव मा.स्थायी समितीचे मंजूरी करीता पाठविणे बाबत मान्यता दिलेली असल्याने अवलोकनार्थ व स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा दि.२८/१२/२००७ रोजीचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.श्री शिंदे द.बा.- मंजूरी द्यावी .

मा.सौ.खरपुडे ज.सु-ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा

मा.सभापती साहेब - प्रस्ताव सर्वानुमते मंजूर .

**ठराव -** अहमदनगर महानगरपलिकेचे प्रभाग क्रमांक १२ मधील वैदूवाडी कमलकुंज घर ते रेणुका स्टील दरम्यान ३०० एम.एम. व्यासाची गटर करणेचे एस्टिमेट ३,१०,८४३/-(रूपये तीन लाख दहा हजार आठशे त्र्येचाळीस फक्त) चे खर्चाचे काम सन २००७-२००८ मधील मागसवर्गीय कल्याणकारी योजने मधून करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर .

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी

सुचक - मा.श्री.शिंदे द.बा.

अनुमोदक - मा.सौ.खरपुडे ज.सु.

ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-१० सोमवार दिनांक ७/१/२००८

ठराव क्रमांक -१० सोमवार दिनांक ७/१/२००८

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीत अस्तित्वात असलेल्या स्ट्रीट लाईट फिटींगचे येणारे वीज बील कमी करणे करितां उर्जा कार्यक्षम उपकरणे / नविन तंत्रज्ञान यांचा वापर करून बी ओ टी तत्वावर राबविणेस देणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकूर**:-उपरोक्त विषयास अनुसरून विनंती करणेत येते कि,अहमदनगर महानगरपालिकेने अहमदनगर महानगरपालिका हद्दीत अस्तीत्वात असलेल्या स्ट्रीट लाईट फिटींग्ज द्वारे येणारे वीज बल कमी करणे करिता नविन उर्जा कार्यक्षम उपकरणे /नविन तंत्रज्ञान यांचा वापर करून BOT तत्वावर राबविणे कामी वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करून निविदा मागविण्यांत आल्या होत्या. सदर कामी एकूण खालील प्रमाणे तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१. सहस्त्रोनिक प्रा.लि.नाशिक
२. कृपा स्टील इन्डस्ट्रीज,नाशिक
३. एशियन इलेक्ट्रॉनिक्स,ठाणे

विषयांकीत कामी प्राप्त झालेल्या निविदा धारकांनी त्यांचे कडील उत्पादनानुसार व तांत्रिक स्पेशिफीकेशन नुसार उपकरणे वापरून वीजबचत करणार असल्याचे नमूद केलेल्या थेट तुलना करता येत नसल्याने याबाबत मेडा,पुणे यांचेकडेही निविदा अभिप्रायासाठी पाठविण्यात आलेल्या होत्या.परंतु मेडा कडे पुरेसे मनुष्यबळ नसल्याने त्याबाबत मनपा स्तरावर निर्णय घेणेस्तव कळविलेले होते. या अनुषंगाने गठीत समिती समवेत समक्ष चर्चा करून निर्णय घेण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारकांशी गठीत समितीसमवेत संयुक्त चर्चा करणे साठी मा.आयुक्त साहेब यांचे दालनात दिनांक २८/११/२००७ तसेच दि.१३/१२/२००७ रोजी (मा.उपमहापौर साहेब व मा.आयुक्त साहेब यांचे दालनात ) बैठक आयोजित करण्यांत आली होती.

गठीत समितीतील सदस्य तसेच वरील तीनही निविदा धारकांचे प्रतिनिधी,इलेक्ट्रीकल विभाग प्रमुख यांचे एकत्रित मा.आयुक्त साहेब यांचे दालनात व मा.उपमहापौर साहेब यांचे दालनात यांचे दालनात चर्चा झाल्या.

तसेच या बाबत दि. २७/१२/२००७ रोजी झालेल्या छाननी समितीने हि प्रोजेक्टचा उदेश,होणारी जास्तीची बचत,एजन्सी ची क्षमता,वापरण्यात येणारे तंत्रज्ञान या बाबत सविस्तर चर्चा करून सदरचे काम एशियन इलेक्ट्रॉनिक्स,ठाणे यांचे मार्फत करण्यास हरकत नाही. असे अभिप्राय दिलेले आहेत (सोबत छाननी समितीचा अहवाल)

प्राप्त तीनही निविदापैकी एशियन इलेक्ट्रॉनिक्स,ठाणे यांनी वीज बचती विषयी मांडलेले -मुद्दे तसेच या संस्थेने इतर महानगरपालिकेकडे केलेल्या कामांचा अनुभव,त्यांची आर्थिक गुंतवणुकीची क्षमता पाहता याबाबत कृपा स्टील इंडस्ट्रीज व सहस्त्रोनिक प्रा.लि. यांनी वीज बचती विषयी मांडलेल्या मुद्यापेक्षाही संयुक्तीक व महानगरपालिकेच्या दृष्टीने आर्थिक हितावह वाटतात. याबाबत छाननी समितीनेही शिफारस केलेली आहे. त्यानुसार वीज बचत प्रकल्पाचे काम एशियन इलेक्ट्रॉनिक्स या कंपनीस देणे बाबतचा विचार करून वीजबचत प्रकल्प राबविताना खालील बाबी प्रामुख्याने विचारात घेणे जरूरीचे वाटते. अशा बाबत सविस्तर ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त साहेब मा.आयुक्त साहेब, यांचे कडे सादर करण्यांत आलेला होता.

१. वीजबचत प्रकल्पात एकाच प्रकारचे फिटींग्ज लागल्यास शहर सुशोभिकरणाच्या दृष्टीनेही विचार होवू शकतो.
२. वीज बचतीची एकच पध्दत वापरल्याने नेमकी किती विज बचत होते. हे कळणे व सुटसुटीत होईल.
३. वीज बचत प्रकल्प राबवितांना संबधीत एजन्सी कडून देखभाल/दुरूस्तीचे काम विनामूल्य करून घेणे उचीत असून यावर महानगरपालिके मार्फत सध्याचा कर्मचारी वर्ग देखरेखी करीता अथवा संयुक्तपणे नेमणे योगय वाटते.
४. वीज बचत प्रकल्प राबविणा-या कंपणीच्या माध्यमातून मिळणा-या कार्बन क्रेडीटचा लाभ महानगरपालिकेस मिळावयास हवा.
५. BIS नॉर्म्स प्रमाणे Lux - level राबविण्यात यावी.
६. भविष्यात वाढणारे फिटींग्ज कंपनी मार्फतच लावण्यात यावेत. बचतीच्या सुत्रानुसार मोबदला देणे योग्य.

सदरचे ऑफिस रिपोर्ट नुसार मा.आयुक्त साहेब, यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय नमूद करून मा. स्थायी समिती समोर सदरचा विषय ठेवणे बाबत आदेश देण्यांत आलेले आहे.

१. तीनही कंपनीची तांत्रिक पध्दत वेगवेगळी आहे. हि पाहण्यासाठी मनपाकडे सक्षम यंत्रणा दिसून येत नाही.
२. सदरचे निविदाही BOT तत्वावर आहे ESCO प्रोजेक्ट नाही.
३. करारनामा हा महानगरपालिकेच्या अटीनुसारच करणे बंधनकारक राहील. त्याचा ESCO अकौंन्ट राहणान नाही.
४. कोणत्याही परिस्थितीत आता मिळणा-या रोडवरील लाईटचा प्रकाश कमी होता कामा नये.
५. तसेच मनपाच्या आताच्या फिटींग्ज जवळजवळ (१३००) त्याचे काय करणार ? त्याचा काही प्लॅन खात्याने सादर केलेला नाही.
६. कार्बन क्रेडीट बद्यलसर्व रक्कम ही महानगरपालिकेस मिळाली पाहीजे.
७. या सर्व योजनेमध्ये महानगरपालिकेचा कोणतीही खर्च राहणार नाही. उलट महानगरपालिकेचा फायदा झाला पाहीजे तसेच नागरीकांना जी सेवा आता मिळते. तशीच किंवा यापेक्षाही जास्ती मिळाली पाहीजे.
८. सर्व फिक्शचर म्हणजेच बल्ब  व इतर सर्व मटेरीयल संबधीत कंपनीनेच वेळच्यावेळी बसवावेत त्याचा कोणताही मोबदला महानगरपालिका देणार नाही.
९. महानगरपालिकेशी याकामी केलेल्या करारनाम्यावर कोणत्याही प्रकारचे कर्ज कंपनीस काढता येणार नाही.

येणे प्रमाणे मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समितीपुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत अस्तित्वात असलेल्या स्ट्रीट लाईट फिटींगचे येणारे वीज बील कमी करणे करितां उर्जा कार्यक्षम उपकरणे / नविन तंत्रज्ञान यांचा वापर करून बी ओ टी तत्वावर राबविणेस देणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट .

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.सभापती साहेब - प्रस्तावाची माहिती द्यावी

मा.श्री कोतकर भा.ए.- कोणत्या निविदा काराची निविदा फायदेशीर आहे ते सांगा.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :- एनर्जी सेव्हींगचा विषय आहे.एशियन इलेक्ट्रॉनिक्स ठाणे यांची ६०.१४% बचत करणारी ९५% हिस्सा असणारी पांच टक्के रॉयल्टी देणारी एजन्सी नेमणेची शिफारस केलेली आहे. इले. विभाग प्रमुख यांनी माहिती सांगावी

इले.विभाग प्रमुख श्री सावळे इंजि.:- तुलनात्मक तक्ता वाचून दाखवितो.- सदर प्रकरणी १. सहस्त्रोनिक प्रा.लि.नाशिक २. कृपा स्टील इंडस्ट्रीज नाशिक ३. एशियन इलेक्ट्रोनिक्स ठाणे अशा तीन निवीदा प्राप्त वीज बचत झाल्या आहेत. सहस्त्रोनिक ४४% एशियन ६०.१४ व कृपा स्टील ४०% अशी वीज बचत दर्शविलेली आहे. त्यात मनपाचा हिस्सा सहस्त्रोनिक १५% एशियन ५% कृपास्टील सात वर्षा मध्ये पहिल्या वर्षी त्यांचा ९७% मनपाचा ३% दुस-या वर्षी त्यांचा ९५% मनपाची ५% तिस-या वर्षी त्यांचा ९२% मनपाचा ८% चौथ्या वर्षी कृपा स्टीलच्या ८५% मनपाचा १५% व सातव्या वर्षी त्यांचा ५०% व मनपाचा ५०% राहील .

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :- कृपा स्टील बचत किती करतो.

इले.विभाग प्रमुख श्री सावळे इंजि.:- ४०% विज बचत दर्शविली आहे.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :- त्यांचे हिश्शाची सरासरी सांगावी.

इले.विभाग प्रमुख श्री सावळे इंजि.:- सरासरी २०.६%

मा.श्री कोतकर भा.ए.:- म.न.पा. हिस्सा ५% असणारी आणि ४०% वीज बचत करणारी या दोहो पैकी कोणती निवीदा फायदेशीर आहे.

इले.विभाग प्रमुख श्री सावळे इंजि.:- प्रत्येकाची टेक्नॉलॉजी वेगवेगळी आहे. एशियन कंपनीचे निविदास मंजूरी देणेची छाननी समितीने शिफारस केलेली आहे.

मा.सभापती साहेब - कृपा स्टीलची निविदा योग्य वाटते का ?

मुख्य लेखाधिकारी श्री कर्डीले पी.बी.:- मनपाचा हिस्सा जादा असलेली कृपा स्टील यांची निविदा योग्य.

मा.श्री कोतकर भा.ए.- त्यांचा अनुभव सांगावा.

इले.विभाग प्रमुख सावळे इंजि.- प्रत्येकाची टेक्नॉलॉजी वेगवेगळी आहे. एशियन कंपनीचे निविदास मंजूरी देणेची छाननी समितीने शिफारस केलेली आहे.

मा.सभापती साहेब :- कृपा स्टीलची निविदा योग्य वाटते का ?

मुख्य लेखाधिकारी श्री कर्डीले पी.बी.:- मनपाचा हिस्सा जादा असलेली कृपा स्टील यांची निविदा योग्य.

मा.श्री कोतकर भा.ए.- त्यांचा अनुभव सांगावा.

इले. विभाग प्रमुख श्री. सावळे इंजि. :- एशियन कंपनीचे प्रोजेक्ट नाशिक अकोला इत्यादी ठिकाणी चालू आहेत. नाशिक येथे ग्राउन्ड प्रोजेक्ट आहे. आपले कडे अंडर ग्राउन्ड काम नाही. प्रत्येकांची टेक्नॉलॉजी वेगवेगळी आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री कर्डीले:-एशियन इलेक्ट्रानिक्स ठाणे यांचे सेव्हीग्ज जादा आहे. इतरांचे कमी आहे.

मा.श्री कोतकर भा.ए.:- कृपा कंपणीची निवीदा फायदयाची वाटते मंजूर करावी.

मा.सौ.दिघे वि.रा.:- मंजूर करावी.

मा.सौ.खरपुडे ज.सु.:- कृपा कंपणीची निवीदा मंजूर करावी.

मा.सभापती साहेब :- सदर प्रकरणी सभेमधील चर्चे मध्ये सहभागी असलेल्या स्थायी समितीचे सदस्यांचे विचार, मत घेवून सर्वानुमते आलेले कमीचे निवीदा दर धारक कृपा स्टील इंडस्ट्रीज नाशिक यांची निविदा मनपाचा आर्थिक फायदा करणारी असल्याने मंजूर करण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्यीत अस्तित्वात असलेल्या स्ट्रीट लाईट फिटींगचे येणारे वीज बील कमी करणे करिता उर्जा कार्यक्षम उपकरणे / नविन तंत्रज्ञान याचा वापर करून बी ओ टी तत्वावर राबविणेस देणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्टावर सभेमधील चर्चे मध्ये सहभागी असलेल्या स्थायी समितीचे सदस्यांचे विचार, मत घेवून सर्वानुमते आलेले कमीचे निवीदा दर धारक कृपा स्टील इंडस्ट्रीज नाशिक यांची निविदा मनपाचा आर्थिक फायदा करणारी असल्याने मंजूर करण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी .

सुचक :- मा.सौ.दिघे वि.रा.

अनुमोदक :- मा.सौ.खरपुडे ज.सु.

ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-११ सोमवार दिनांक ७/१/२००८

ठराव क्रमांक -११ सोमवार दिनांक ७/१/२००८

**प्रस्तावाचा विषय** - अहमदनगर महानगरपालिकेचे हद्यी मधील महात्मा फुले चौक ते सारस नगर पुलापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ .

**प्रस्तावाचा मजकूर** - प्रस्तावना - विषय - निविदा मंजूरी बाबत.

कामाचे नांव - महात्मा फुले चौक ते सारसनगर पुलापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे.

महोदय,

उपरोक्त विषयी खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकीय मान्यता : मा.शासन निर्णय २१०७/८४० दि. ३/१०/०७ अन्वये कामास मंजूरी.
२. प्रशासकीय मान्यता रक्कम रू. १४,०४,३०२ = ००
३. तांत्रिक मान्यता रक्कम रूपये १४,०४,३०२ = ००
४. तांत्रिक मान्येतेची दरसूची २००६-२००७
५. निवीदा (परिशिष्ट ' ब ') रक्कम रू. १३,७०,०५० = ००
६. निवीदा प्रसिध्दी तारीख ६/१०/२००७
७. निविदा विक्री कालावधी ०८/१०/२००७ ते २३/१०/२००७ (१५ दिवस)
८. निविदा स्विकारण्याची तारीख २६/१०/२००७
९. निवीदा उघडण्याची तारीख २९/१०/२००७
१०. कामाची मुदत ६ महिने
११. प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | श्री.शिवाजी बढें | ३५% जादा |
| २ | मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन, कंपणी अ.नगर | ३८% जादा |
| ३ | श्री विजय म्हस्के | २४.५०% जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने श्री विजय म्हस्के, अ.नगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा २४.५०% जादा आहे. ठेकेदारास वाटाघाटीसाठी दि.३१/१०/०७ रोजी पत्र दिले असता त्यांनी दि. २१/११/०७ चे पत्रान्वये दर कमी करून सुधारीत देकार २४.५०% जादा केला आहे. सदर प्रस्ताव छाननी समितीसमोर दि.२३/११/०७ रोजी चर्चेस ठेवला होता.

छाननी समितीने शिफारस केल्यानुसार सदर देकार चालू दरसुचीशी तुलना करता ९% जादा येत आहे.

सदर निविदा चालू दरसुचीच्या तुलनेत ९% जादा दराची असल्याने अवलोकनार्थ व स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा दि.२८/१२/२००७ रोजीचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय** - अहमदनगर महानगरपालिकेचे हद्यी मधील महात्मा फुले चौक ते सारस नगर पुलापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ .

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.श्री तिवारी सु.र.:- प्रस्ताव मंजूर करावा

मा.श्री कोतकर भा.ए.:- करंट रेट प्रमाणे निर्णय घेण्यांत यावा. २ ते ४% जादा दर देवून प्रस्ताव मंजूर करावा.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब -चालु दर सुचीचे दरा पेक्षा दहा टक्केचे आत दर असल्याने प्रस्ताव मंजूरीची शिफारस केलेली आहे. मा.सभेने निर्णय घ्यावा.

मा.श्री शेख आ.शे.रं.:-आलेले दर जादा असल्याने चालु दरसुचीचे ४% जादा दराने काम मंजूर करावे.

मा.श्री कोतकर भा.ए.:- आलेले दर जादा आहेते.चालु दर सुचीचे दरापेक्षा ४% जादा दराने काम करणेस मंजूरी द्यावी.

मा.सभापती साहेब :- सभे पुढे आलेला चालु दर सुचीचे ९% जादा दर असलेल्या निविदा धारक श्री विजय म्हस्के यांचे निविदा दर जास्त असल्याने यांना चालु दर सुचीचे दरापेक्षा ४% जादा दराने काम देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिकेचे हद्यीमधील महात्मा फुले चौक ते सारसनगर पुला पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता आलेले निविदा दर हे जास्तीचे असल्याने तुलनात्मक दृष्टया कमीचे निवीदा दर धारक श्री विजय म्हस्के त्यांना सदरचे काम चालू दर सुची पेक्षा ४% जादा दराने काम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी

सुचक - मा.सौ.पवार सं.बा

अनुमोदक - मा.श्री शिंदे द.बा.

ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-१२ सोमवार दिनांक ७/१/२००८

ठराव क्रमांक -१२ सोमवार दिनांक ७/१/२००८

**प्रस्तावाचा विषय** अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील डांबरी रस्त्यांचे कामांसाठी मा.शासनाचे नियमाप्रमाणे प्राईस व्हेरिएशन क्लॉज (Price Variation clause) लागू करणे बाबतचा अहवाल निर्णयास्तव .

**प्रस्तावाचा मजकूर** - प्रस्तावना -विषय - २६/१०/२००७ रोजी दाखल केलेल्या डांबरीकरण कामाची निविदा बाबत.

सादर,

विनंती रिपोर्ट कि , अहमदनगर हद्यीतील रस्त्यांचे मजबूतीकरण,डांबरीकरण करणे कामांना दिनांक ३/१०/०७ रोजी मंजूरी मिळाली. त्याप्रमाणे दिनांक ६/१०/२००७ रोजी जाहिर निविदा प्रसिध्द केली सदर कामांची कोरे टेंडर फॉर्मे विक्री कालावधी दिनांक ८/१०/२००७ ते २३/१०/२००७ अखेर होती. दिनांक २६/१०/२००७ रोजी दुपारी २ =०० वाजेपर्यत निविदा स्विकारण्याची मुदत होती. मुदतीत प्राप्त झालेले निविदाचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आले व ठेकेदारांना दरामध्ये वाटाघाटीमध्ये दिनांक ३१/१०/०७ रोजी पत्र देण्यात आले त्या अनुषंगाने त्यांनी दिनांक २९/११/०७ रोजी पत्र देवून त्यांचे कडील कामांचे नविन दर कळविले. आलेले दराबाबत प्रस्ताव दिनांक २३/११/२००७ रोजी छाननी समितीसमोर चर्चेत ठेवला. छाननी समितीने शिफारस केल्यानुसार सदर देकार चालू दरसुचीशी तुलना करून कमीत कमी दराची असलेली निविदा अवलोकनार्थ व स्थायी समितीच्या मंजूरीसाठी पाठविण्यांत आला आहे. परंतु निविदा धारक यांनी दिनांक १७/१२/०७ रोजी लेखी स्वरूपात डांबराच्या दरामध्ये मोठयाप्रमाणात वाढ झाल्याने डांबराचा दराचा भाववाढ फरक (PRICE VARIATION CLAUSE) मिळणे बाबत विनंती केलेली आहे. शासनाने (BPCL & HPCL) कंपनीने डांबराच्या दरामध्ये दिनांक १/१०/२००७ ते ३१/१२/२००७ अखेर प्रति मेट्रीक टनास मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. १/१०/०७ चे दर रू.२४७८६/- प्रति टन व ३१/१२/०७ चे दर रू.३२२२६/- प्रति टन असे झालेले आहे.

या कामांच्या निविदा काढताना Price Variation clause ठेवण्यांत आलेला नव्हता. तसेच दिनांक २४/१०/२००७ रोजी झालेल्या निविदा पूर्व बैठकी मध्ये सदर अट घालण्याची मागणी झाली होती. तथापी ती फेटाळण्यात आली त्यामुळे या निविदांसाठी ही अट नाकारण्यात आली आहे.

सन २००७-२००८ च्या दर सुचीशी तुलना करताना दिनांक १६/११/२००७ रोजी अस्तितवात असलेले डांबराचे दर विचरात घेण्यात आले आहेत. त्यानुसार निविदांची तुलना करून मंजूरीस्तव सादर करण्यांत आल्या आहेत.या ३४ कामांच्या निविदा मंजूरी टप्प्यांवर असल्याने आता हा भाववाढीचा CLAUSE अंतर्भूत करता येणार नाही. या पुढील निविदांमध्ये सदर CLAUSE अंतर्भूत करता येईल, असे वाटते. डांबराचे दर सध्या मोठयाप्रमाणात वाढत आहेत. काम गुणवत्तेचे होणेसाठी व वरील CLAUSE लागू नसल्याने डांबराच्या दराचा फरक देणे संयुक्तीक वाटते आदेशार्थ सादर.

सार्वजनिक बांधकाम मंडळ नाशिक विभाग नाशिक यांचे परिपत्रक जा.क्र.प्र.आ./दरसुची २००७-२००८ /८९८०/२००७ दिनांक २६/११/०७ मधील तरतुदीनुसार डांबराचे दर दि.१६/११/०७ पासून पुढील आदेशा पर्यत परिपत्रकात नमूद केल्यानुसार अंमलात राहतील अशी तरतूद आहे. व तेच दर महानगरपालिकेच्या ३४ कामासाठी अंदाजपत्रकात अंतर्भूत आहेत. त्यामुळे वाढीव दर पुन्हा मंजूर करणे योग्य नाही. तथापी भविष्यात दर वाढल्यास "अ " प्रमाणे कार्यवाही करण्यास हरकत नाही.

तरी विषयांकीत प्रस्ताव मंजूरीस्तव मा.स्थायी समितीपुढे पाठविण्यांस सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.सभापती साहेब :- डांबराची दरवाढ देणे विषयीचा प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :- बी ॲण्ड सी चे मॅन्युअल प्रमाणे माहिती द्यावी.

कार्यकारी अभियंता श्री मगर एन.बी.:- डांबराचे दर वाढवून देणे बाबत प्रस्ताव आहे.सार्वजनिक बांधकाम मंडळ नाशिक विभाग नाशिक यांचे परिपत्रक जा.क्र.प्र.आ./दरसुची २००७-०८/८९८०/२००७ दिनांक २६/११/०७ मधील तरतुदी नुसार डांबराचे दर दिनांक १६/११/२००७ पासुन पुढील आदेशा पर्यत परिपत्रकात नमूद केल्या नुसार अंमलात राहतील अशी तरतूद आहे.पंरतु दिनांक १/१०/२००७ ते दि.३१/१२/२००७ अखेर डांबराचे प्रती मेट्रीक टनाचे भावात वाढ झालेली आहे. दिनांक १/१०/२००७ रोजी असलेले रू.२४७८६/- दर वाढून दि.३१/१२/०७ रोजी रूपये ३२,२२६/- प्रति टन असे झालेले आहेत.

मा.श्री कोतकर भा.ए.:- क्लॉज म्हणजे काय

मा.उपायुक्त श्री हांग साहेब :- बी वन या ठरावीक मर्यादा असलेल्या निविदा मध्ये डांबर,खडी,इत्यादी साहित्य, त्याची वाहतुक इत्यादी दरवाढीचा फरक देण्या बध्दल निविदेमध्ये अट असते.क्लॉज असतो तो या ३४ कामांना लावलेल्या नाही या पुढे लावणेत येईल. डांबराची दरा वाढ देण्या विषयीचा हा प्रस्ताव आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री कर्डीले :- कोणत्याही साहित्याचे भाव वाढले तर दर वाढवून देता येतील तसेच भाव कमी झाले तर दरवाढ कमी करता येईल.

मा.सभापती साहेब :- डांबराची दरावाढ देणेचा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील डांबरी रस्त्यांचे कामांसाठी मागविण्यांत आलेल्या निविदा मध्ये मा.शासनाने नियमाप्रमाणे प्राईज व्हेरीएशन क्लॉज (Price Variation clause) लागु करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी

सुचक - मा.श्री शेख आरिफ शे.र.

अनुमोदक - मा.सौ.दिघे वि. रा.

ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक-१३ सोमवार दिनांक ७/१/२००८

ठराव क्रमांक -१३ सोमवार दिनांक ७/१/२००८

**प्रस्तावाचा विषय** - घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत बुरूडगांव स.नं.३४ (पैकी) या जागेवर घनकच-या पासून खत निर्मिती / उर्जा निर्मिती करणे बाबत बांधा,वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर मागविलेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता मंजूरीस्ताव .

**प्रस्तावाचा मजकूर** - सविनय सादर,

विषय - अहमदनगर महानगरपालिका हद्यीमध्ये निर्माण होणा-या घनकच-यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून खत निर्मिती/ उर्जा निर्मिती /बायोगॅस निर्मिती प्रकल्प उभारणे बाबत.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यांत येतो कि, अहमदनगर महानगरपालिका हद्यीमध्ये निर्माण होणा-या घनकच-यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून खत निर्मिती / उर्जा निर्मिती / बायोगॅस निर्मिती प्रकल्प बांधा,वापरा,व हस्तांतरीत करा (बी.ओ.टी.) तत्वावर उभारणे कामी वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीर फेर टेंडर नोटीस प्रमाणे मुदतीत खालील प्रमाणे दोन निविदाकार यांचे कडून सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१. हायड्रोएअर टेक्नोटिक्स (पी.सी.डी.) लि.बेलापुर,नवी मुंबई .
२. अजिंक्य बायोफर्ट,प्लॅट नं.७,मयुरेश सोसायटी,फाटक बाग,पुणे-३०

सदरच्या सिलबंद निविदा मा.उपायुक्त (कर) यांचे दालनात उपस्थित निविदाकार यांच्या समक्ष उघडयात आल्या त्यांनतर प्राप्त झालेल्या फेरनिविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

१. हायड्रोएअर टेक्नोटिक्स (पी.सी.डी.) लि.बेलापूर,नवी मुंबई .

सदर खाजगी एजन्सी प्रकल्पाचा संपूर्ण भांडवली खर्च स्वत: करणार आहे.व प्रकल्पापासुन मिळणा-या उत्पन्नावर ५% रॉयल्टी देणार आहे. तसेच महानगरपालिकेची संपूर्ण सॅनेटरी लॅन्डफिल साईट डेव्हलमेंट स्वखर्चाने उभारून देखभाल व दुरूस्ती स्वखर्चाने करण्यास तयार आहे. तसेच कुठलेही टिपींग चार्जेस सुध्दा घेणार नाही. असे निविदेमध्ये नमूद केले आहे.

२. मे.अजिंक्य बायोफर्ट,फाटक बाग ,पुणे.

सदर खाजगी एजन्सीने घनकच-यावर प्रक्रिया करून गांडूळखत निर्मिती प्रकल्प उभारणे बाबतचा

प्रस्ताव निविदेमध्ये सादर केलेला आहे. प्रकल्प उभारणीचा खर्च व देखभालीचा निविदेमध्ये नमूद केलेला खर्च देण्याची व्यवस्था महानगरपालिका करेल असे नमूद केलेले आहे. निविदेमध्ये रॉयल्टीची टक्केवारी नमूद केलेली नाही. तसेच टिपींग चार्जेस प्रकल्पावर येणा-या एकूण कच-याच्या वजनाच्या रूपये २५०/- प्रती टन व लॅन्ड फिल्ड चार्जेस उर्वरीत कचा-याच्या वजनाच्या रूपये १३०/- प्रति टन महानगरपालिकेने द्यावे असे नमूद केले आहे. तसेच निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी व्यतिरिक्त अटी व शर्ती नमूद केलेल्या आहेत.

वरील प्राप्त झालेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता पाहता एकच निविदा हि " बी.ओ.टी." तत्वावर असल्याची दिसून येते याची नोंद घेवून प्रशासकीय संपूर्ण प्रकरणांसह प्रस्ताव दि.२/१/२००८ रोजीच्या समितीसमोर ठेवण्यात आला असता. सदरच्या छाननी समितीमध्ये सदर प्रस्तावाचे अवलोकन केले असता खालील प्रमाणे चर्चा करू न बदल प्रस्तावीत करण्यात आले सदरचा प्रकल्प हा BOT (बांधा वापरा व हस्तांतर करा) या तत्वावर असल्या कारणाने मनपाला शासनाकडून प्राप्त होणारे १२ वा वित्त आयोग व इतर कोणत्याही संस्थेकडून प्राप्त होणारे निधी,अनुदान यावर मनपाचा अधिकार राहील. त्यावर निविदाकाराचा कसलाही संबध असणार नाही त्याचप्रमाणे निविदेतील अट क्र.१,२,३ बाबत याअनुषंगाने बदलाची नोंद निविदाकार यांनी घेणे बंधनकारक आहे.

निविदेतील अट क्रं.८ मधील मनपा सहकार्य करेल यांचा अर्थ मनपा फक्त आवश्यक ती माहिती उपलब्ध करून देईल.

निविदेतील अट क्र.९ चे अनुषंगाने मनपा प्रकल्प काळात फक्त पाण्याचे कनेक्शन उपलब्ध करून देईल त्यांचे शुल्क नियमानुसार निविदाकारास भरावे लागेल.विद्युत जोडणीस मनपा सहकार्य करेल मात्र आवश्यक ते शुल्क व इतर बाबीची पूर्तता कंत्राटदारास करावी लागेल.

निविदेतील अट क्र.१० चे अनुषंगाने निविदाकारास नियमास अधिन राहून इतर उत्पादन करणे पूर्वी मनपाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

सदर प्रकल्प हा कार्यादेश दिल्यापासून चार महिन्याचे आत कार्यान्वित होणे बंधनकारक राहील.

निविदेतील अट क्रं. १३ च्या अनुषंगाने मनपा कचरा डेपोवर कचरा उपलब्ध करून न दिल्यास निविदाकाराची कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

निविदेतील अट क्रं. २३ हि पूर्णतः रद्य करण्यात आलेली आहे. याची नोंद निविदाकाराने घ्यावी

निविदेतील अट क्र. २५ ही वगळण्यात येवून त्याएवजी खालील प्रमाणे नोंद घ्यावी प्रकल्प कालावधी दरम्यान मनपा हद्दीतील निर्माण होणारा घन कचरा उपलब्ध करून दिला जाईल. सन २००८-०९ या वर्षासाठी साधारणातः अंदाजे ७० मे टन प्रती दिन कचरा उपलब्ध करून दिला जाईल. तसेच दरवर्षी साधारणतः अंदाजे ७० मे टन प्रती दिन कचरा वाढीचे प्रमाणे लक्षात घेवून वेळोवेळी निर्माण होणारा वाढीव कचरा निविदाकार यांनी घेणे बंधनकारक राहील.

निविदाकार याने नमूद केलेली शेकडा रॉयल्टी हि कंपोस्ट खताच्या व निविदाकाराने निविदेत नमूद केलेल्या इतर उत्पादनाच्या एकूण विक्री रकमेच्या शेकडा प्रमाणात देणे बंधनकारक राहील.

निविदेतील अट क्र.३२ मधील करारातील कलम ४४ प्रमाणे लवादाकडे तक्रार दाखल करेल व लवादाचा निवाडा कंत्राटदार व मनपा यांचेवर बंधनकारक राहील. या ऐवजी होणा-या नुकसानीस मनपा कोणत्या बाबतीत जबाबदार राहणार नाही. अशी अट क्रं. ३२ मध्ये नोंद घेणे आवश्यक आहे.

निविदेतील अट क्र. ३९ व ४३ पूर्णताः रद्य करण्यांत आली आहे.

तरी मे.हायड्रोएअर टेक्नोटिक्स (पी.सी.डी.) लि.बेलापूर,नवी मुंबई या खाजगी एजन्सीचा देकार मनपाच्या दृष्टीने आर्थिक दृष्टया हितकारक असल्याने प्रथमदर्शनी दिसुन येते. सदरहु एजंन्सीच्या निविदेमध्ये जोडलेल्या कागदपत्रांवरून खत निर्मिती प्रकल्प उभारण्याबाबतचा अनुभव पाहता तसेच महानगरपालिकेने नमूद केलेल्या अटी व शर्ती पाहता सदर एजंन्सीची निविदा

प्रथम दर्शनी योग्य वाटते. तसेच त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व इतर आवश्यक परवाने बाबत निविदाकाराने पूर्तता करणे आवश्यक आहे.

म.न.पा.च्या सार्वजनिक उदयांनासाठी आवश्यक तो खत पुरवठा निवीदाकार यांना करावा लागेल.

लॅडफिल साईट भविष्यातील शहराची एकूण कचरा वाढ लक्षात घेवून विकसीत स्वतः निविदाकार यांना करावी लागेल. तसेच अटी व शर्ती मध्ये आवश्यकते नुसार बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त म.न.पा.अ.नगर यांना राहील.

वरील प्रमाणे बदल करण्या बाबत सुचविण्यात येवून पुढील कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती कडे सादर करणे योग्य तसेच मे.हायड्रोएअर टेक्नोटिक्स (PCD) लि.बेलापुर, मुंबइ यांची निविदा म.न.पा.च्या दृष्टीने आर्थिक दृष्टया हितकारक दिसुन येते. सदरहू एजन्सीचा खत निर्मीती प्रकल्प उभारणे बाबतचा त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरून अनुभव पाहता तसेच म.न.पा.ने निविदेमध्ये नमूद केलेल्या बहुतांशी अटी व शर्ती मान्य करत असलेल्या पहाता परंतु मा.छाननी समितीने प्रस्तावीत केलेल्या बदलास अधिन राहुन मे.हायड्रोएअर टेक्नोटिक्स (PCD) लि.बेलापूर,मुंबई यांची निविदा योग्य वाटते.

निविदाकार यांनी निविदेतील बेसिस ऑफ ऑफर मध्ये नमूद केलेला मुद्या क्र.१० अमान्य करण्यात येत .निविदा मंजूर झाल्यानंतर महानगरपालिकेचे विधी सल्लागार यांचे मार्गदर्शनाखाली करारनामा करण्यात येईल व त्यानंतर कार्यरंभ आदेश देणे योग्य राहील.

वरील प्रमाणे छाननी समितीचा अहवाल मा.आयुक्त यांचे कडे सादर केला असता त्यांनी खालील प्रमाणे मुद्दे सुचीत केले आहेत.

१. हायड्रोएर टेक्नोटिक्स (पी.सी.डी.)लि. बेलापुर, नवी मुंबई यांचे तंत्रज्ञान कागदोपत्री योग्य वाटते परंतु BOT करारनाम्याचा कालावधी ३० वर्षा पर्यत असल्याने प्रत्यक्ष कंपनीचा चालु असलेला प्रकल्प पहाणे आवश्यक आहे.
२. सद्यस्थिती मध्ये म.न.पा. मार्फत अंदाजे ७० मेटन कच-याचे संकलन व वाहतुक केली जाते कंपनीने १५० मे टन प्रतिदिन क्षमतेचा प्रकल्प अहवाल सादर केला आहे. तरी सद्यस्थितीत ७० मे टन कच-या वर प्रकल्प उभारणेस कंपनी तयारआहे. किंवा कसे या बाबत कंपनीशी चर्चा करणे जरूरीचे आहे. कचरा जेवढा उपलब्ध होईल तेवढाच निविदाकारास मिळेल.
३. कंपनीला फक्त भाडे तत्वावर (रेंटल बेसीस ) वर जागा उपलब्ध करून दिली जाईल.
४. प्रकल्पास आवश्यक असणारी विज व पाण्याचे शुल्क कंपनी स्वतः भरेल.
५. कोणत्याही प्रकारचे कर्ज किंवा आर्थिक व्यवहार या करारनाम्यावर करता येणार नाही.
६. तसेच कोणत्याही परिस्थीतीत म.न.पा.आर्थिक खर्च करणार नाही.
७. BOT चे फक्त एकच टेंडर आलेले आहे. याचा हि विचार करणे गरजेचे आहे.
८. करारनामा केल्यानंतर एक महिन्यात काम सुरू करून चार महिन्यात प्रकल्प उभरणे आवश्यक आहे.

तरी छाननी समितीने प्रस्तावीत केलेल्या मे हायड्रोएर टेक्नोटिक्स,(PCD) लि. बेलापुर,नविमुंबई या खाजगी कंपनीचा प्रस्ताव अटी व शर्ती तसेच इतर अनुषंगिक बदल व मा.आयुक्त यांनी सुचविलेले मुद्द्यांचा समावेश करून प्रस्ताव पुढील निर्णयास्तव मा.स्थायी समितीकडे सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.सभापती साहेब :- प्रस्तावाची माहिती द्यावी.

शाखा अभियंता श्री मेहत्रे आर.जी. :- सदर कामाच्या १. हायड्रोएअर टेक्नाटिक्स (पी सी डी ) ली बेलापूर नवी मुंबई व २. अजिक्य बायोफर्ट प्लॅट नं. ७ मयुरेश सोसायटी फाटक बाग पुणे अशा दोन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. हायड्रोएअर टेक्नाटनिक्स (पी.सी.डी.) लि.बेलापूर ही सदर खाजगी एजन्सी प्रकल्पाचा संपूर्ण भांडवली खर्च स्वतः करणार आहे व प्रकल्पा पासुन मिळणा-या उत्पन्नावर ५% रॉयल्टी देणार आहे.तसेच मनपाची संपूर्ण सॅनिटरी लॅन्ड फिन्ड साईड डेव्हलमेंट स्वखर्चाने उभाररून देखभाल व दुरूस्ती स्वखर्चाने करण्यांस तयार आहे. तसेच कुठलेही टिपींग चार्जेस सुध्दा घेणार नाही असे निविदेत नमूद आहे. दुसरी निविदा मे.अजिक्य बायोफर्ट फाटक बाग पुणे यांची असून सदर खाजगी एजन्सीने कच-यावर प्रक्रिया करून गांडूळ खत निर्मीती प्रकल्प उभारणे बाबतचा प्रस्ताव निविदेमध्ये सादर केलेला आहे.प्रकल्प उभारणीचा खर्च मनपा करेल असे नमूद आहे.रॉयल्टी निविदेत नमूद केलेली नाही प्रकल्पावर येणा-या कच-याच्या वजनाच्या रू.२५०/- प्रतिटन लॅन्ड फिल्ड चार्जेस उर्वरीत कच-याच्या वजनाच्या रूपये १३०/- प्रति टन मनपाने द्यावे असे नमूद आहे. एकच निविदा BOT तत्वावर असल्याचे दिसून येत छाननी समितीने अवलोकन केल असता चर्चा करून बदल प्रस्तावीत करण्यांत आलेले आहेत.

मा.उपायुक्त श्री हांगे साहेब :- मा.आयुक्त साहेबांनी काय सुचित केले आहे.

शाखा अभियंता श्री मेहत्रे आर.जी. :- मा.आयुक्त साहेब यांनी १)हायड्रोएर टेक्नोटिक्स (पी सी डी) लि.बेलपूर नवी मुंबई यांचे तंत्रज्ञान कागदोपत्री योग्य वाटते.परंतु BOT करारनाम्याचा कालावधी ३० वर्षा पर्यत असल्याने प्रत्यक्ष कंपनीची चालु असलेला प्रकल्प पहाणे आवश्यक आहे. २) सध्या स्थितीत मनपा मार्फत अंदाजे ७० मे टन कच-याचे संकलन व वाहतुक केली जाते. कंपनीने १५० मे.टन प्रतिदिन क्षमतेचा प्रकल्प अहवाल सादर केला. आहे.सध्यास्थितीत ७० मे टन कच-यावर प्रकल्प उभारणेस कंपनी तयार आहे. किंवा कसे या बाबत कंपणीशी चर्चा करणे जरूरीचे आहे. कचरा जेवधा उपलब्ध होईल तेवढाच निविदाकारास मिळेल. ३) कंपनीला फक्त भाडे तत्वावर रेन्टल बेसीस वर जागा उपलब्ध करून दिली जाईल.४). प्रकल्पास आवश्यक असणारी विज व पाण्याचे शुल्क कंपनी स्वतः भरले ५). कोणत्या हि प्रकारचे कर्ज किंवा आर्थिक व्यवहार या करारनाम्यावर करता येणार नाही. ६) तसेच कोणत्याही परिस्थितीत म.न.प.आर्थिक खर्च करणार नाही. ७) BOT चे फक्त एकच टेंडर आलेले आहे यांचा विचार व्हावा.८). करारनामा केल्या नंतर एक महिन्यात काम सुरू करून चार महिन्यात प्रकल्प उभारणे आवश्यक आहे. छाननी समितीने प्रस्तावीत केलेल्या हायड्रोऐर टेक्नोटिक्स (पी सी डी) लि.बेलापूर नवी मुंबई याखाजगी कंपनीचा प्रस्ताव अर्टी व शर्ती तसेच इतर अनुषंगाने बदल व मा.आयुक्त यांनी सुचविलेल्या मुद्यांचा समावेश करून प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समितीकडे सादर केलेला आहे.

मा.सभापती साहेब :- एकच निविदा BOT तत्वावर प्राप्त झालेली आहे.त्याचे प्रकल्प कुठे कुठे चालु आहेत.

शाखा अभियंता श्री मेहत्रे आर.जी.:- त्याचे राज्या बाहेर प्रकल्प चालु असून इचलकरंजी येथे प्रकल्प चालु होणार आहे. त्यांचे प्रकल्पच पहाणेचा मुद्या मा.आयुक्त साहेबांनी मांडलेला आहे.या मध्ये मनपाची इन्व्हेस्टमेट शन्यु असून मनपास खर्च नाही रॉयल्टी ५% मिळणार आहे.

मा.श्री शिंदे द.बा. :- लाईट बील कोण भरणार आहे.

शाखा अभियंता श्री मेहत्रे :- त्यांना भरावयाचे आहे.

मा.श्री.शिदें द.बा.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.तसेंच मनपाचे आरोग्य विभगाकडेस असलेली वाहने अपुरी असून ती वारंवार ना दुरूस्त होतात,नादुरूस्त असतात. मनपा कडेस बाराव्या वित्त आयोगाचा निधिी उपलब्ध असल्याने आरोग्य विभागासाठी वाहने खरेदी करणे आवश्यक आहे. त्या साठी सदर निधीतून वाहने खरेदीसाठी शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करणेस, वाहने खरेदीस व खर्चास मंजूर द्यावी.

मा.सौ.दिघे वि.रा.:- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते BOT तत्वावर आलेली हायड्रोएर टेक्नोटिकस बेलापूर नवि मुंबई यांचे निविदासमनपाने प्रसिध्द केलेल्या निवीदेमधील मूळ अटी व शर्ती नुसार सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी. मात्र मनपा उपलब्ध करेल तेवढाच कचरा निविदाकार यांनी स्विकारणे बंधनकारक राहील व मनपास प्राप्त होणारा निधी मनपाकडेस राहील तसेंच मनपाचे आरोग्य विभगाकडेस असलेली वाहने अपुरी असून ती वारंवार ना दुरूस्त होतात,नादुरूस्त असतात. मनपा कडेस बाराव्या वित्त आयोगाचा निधिी उपलब्ध असल्याने आरोग्य विभागासाठी वाहने खरेदी करणे आवश्यक आहे. त्या साठी सदर निधीतून वाहने खरेदी करणेसाठी शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करणेत यावी,आरोग्यविभागासाठी वाहने खरेदीस व खर्चास मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव** - घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत बुरूडगांव स.नं.३४ (पैकी) या जागेवर घनकच-या ाासुन खत निर्मीती / उर्जा निर्मीती करणे बाबत बांधा वापरा हस्तांतरीत करा या तत्वावर मागविलेल्या निविदांचा तुलणात्मक तक्ता,ऑफिस रिपोर्ट पहाता बी ओ टी तत्वावर प्राप्त झालेली एकमेव अशी हायड्रोएअर टेक्नोटिक्स (पी सी डी) लि बेलापूर नवी मुंबई यांचे निविदास मनपाने प्रसिध्द केलेल्या निवीदेमधील मूळ अटी व शर्ती नुसार मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.मात्र मनपा सध्य स्थितीत जेवढा कचरा उपलब्ध होईल तेवढाच निवीदाकार यांनी स्विकारणे बंधनकारक राहील. तसेच निविदाकार यांचे " बेसिक ऑफ " मधील अट क्रमांक दहा अन्वये प्राप्तहोणारा निधी हा मनपा कडेस जमा होईल व त्यावर मनपाचे नियंत्रण राहील. तो निविदाकार यांचे कडे प्रत्यक्ष जमा होणार नाही.

तसेंच मनपाचे आरोग्य विभगाकडेस असलेली वाहने अपुरी असून ती वारंवार ना दुरूस्त होतात,नादुरूस्त असतात. मनपा कडेस बाराव्या वित्त आयोगाचा निधी उपलब्ध असल्याने आरोग्य विभागासाठी वाहने खरेदी करणे आवश्यक आहे. त्या साठी सदर निधीतून आवश्यकते प्रमाणे वाहने खरेदी करणेसाठी शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करणेत यावी,आरोग्यविभागासाठी वाहने खरेदी करणेस व त्या कामी येणा-या खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी

सुचक - मा.श्री.शिदें द.बा.

अनुमोदक -मा.सौ.दिघे वि.रा.

ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका